# जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये नमूद केलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवासा सदर मिळकतीच्या हितसंबंधितांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजेमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे- ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल, व जमीन महापालिका ताब्यात घेतील. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट १)-** मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दातील मौजे तळवडे येथील गट नं. २४ पै मधील श्री. गोविंद विष्णू नखाते व इतर १६ व श्रीमती सुशीला दत्तात्रय हिंगमिरे व इतर ५ यांस तर्फे कु.मु.धारक मे. ओम साई कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री. शंकर पांडुरंग जगताप व श्री विजय पांडुरंग जगताप यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. व आ.क्र. १/४८ दफनभूमी या प्रस्तावाने बाधीत क्षेत्र ११२७६.७५ चौ.मी. क्षेत्र जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमाः- मौजे तळवडे येथील गट नं. २४ पै १२.०० मी . व आ.क्र. १/४८ दफनभूमी या प्रस्तावाने बाधीत क्षेत्र ११२७६.७५ चौ.मी.

उत्तेरस- नदी

पूर्वेस- गट नं. २५ पैकीची मिळकत

दक्षिणेस- गट नं. २४ पैकीची मिळकत

पश्चिमेस – गट नं. २३ पैकीची मिळकत

**परिशिष्ट** २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दातील मौजे रहाटणी येथील स.नं. २८/२ब पैकी सि.स.नं. १४९० पैकी श्रीमती सुषमा सिद्राम शिंदे यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रातील ३०.०० मी. (एचसीएमटीआर) बाधित अंदाजे क्षेत्र ११०.० चौ.मी जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमाः-

पूर्वेस- स. नं. २८ पैकी सि.स.नं. १४९० पैकी मिळकत
पश्चिमेस – स. नं. २८ पैकी सि.स.नं. १४९० पैकी मिळकत
दक्षिणेस- स. नं. २८ पैकी सि.स.नं. १४९० पैकी मिळकत
उत्तेरस- अर्जदार यांची स.नं. २८ पैकी उर्वरित मिळकत

परिशिष्ट – ३

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे तळवडे येथील गट नं.१८७ पै मधील श्रीमती बबुताई छबु भालेकर व इतर ७ यांस तर्फे कु.मु.धारक मे. ओम साई कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री शंकर पांडुरंग जगताप यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील १८मी. व १२.मी. रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र ४०३३.०० चौ मी क्षेत्र जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा – मौजे तळवडे स.नं. १८७पै. १८.०० मी. व १२.०० मी. रस्ताबाधीत क्षेत्र ४०३३.०० चौ.मी.

उत्तरेस – गट नं. १९४, १९५, १९८ व १९९ ची मिळकत
पूर्वेस - गट.नं. १८८ व १८७ पैकीची मिळकत
दक्षिणेस – गट.नं. १८३ व १८७ पैकीची मिळकत
पश्चिम - गट.नं. १९९ व १८७ पैकीची मिळकत

**परिशिष्ट ४)-** मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दातील मौजे दापोडी येथील स.नं. २७,सि.स.नं. १८५७ पै श्री. सतीश बसवंत पाटील यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे विकास योजनेतील आ.क्र. ३/१ उद्यान या आरक्षणाने बाधीत क्षेत्र १३४७.५८ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा:-

उत्तेरस- लागू स.नं. २७ पैकीची मिळकत
दक्षिणेस- लागू स.नं. २७ पैकीची मिळकत
पूर्वेस- लागू स.नं. २८ ची मिळकत
पश्चिमेस – नदी

**परिशिष्ट ५)-** मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दातील मौजे भोसरी(कासारवाडी) येथील स.नं. ४९८/७ पैकी,सि.स.नं. १८६२ पै, १८६२/१ ते ४ पै, मधील श्री. संदीप रसिकलाल शाह यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील १२.०० मी रूंद रस्त्याने बाधीत क्षेत्र १०१.७० चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा:- १२.०० मी रस्ताबाधीत क्षेत्र १०१.७० चौ.मी.

उत्तेरस- ला. सि.स.नं. १८६५
पूर्वेस- ला. लोहमार्ग
दक्षिणेस- ला. सि.स.नं. १८६१
पश्चिमेस – ला. सि.स.नं. १८६३/११

**परिशिष्ट – ६)** मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी मुळशी, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स.नं. ८० पैकी मधील श्री.आनंदा गणपत विनोदे , श्री. तुकाराम गणपत विनोदे , श्रीम. हिराबाई गुलाब कोकणे यांच्या मालकीच्या मिळकतीतील वाढीव हद्दीच्या मंजुर विकास योजनेतील ३६.०० मी. रूंद रस्त्याचे बाधित क्षेत्र ७४०३.७३ चौ.मी. जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमाः-

| | |
|---|---|
| उत्तरेस - | लागु स.नं. ८० पैकीची अर्जदाराची उर्वरीत मिळकत. |
| दक्षिणेस - | लागु स.नं. ७८ पैकीची मिळकत. |
| पूर्वेस - | लागु स.नं. ८३ पैकीची मिळकत. |
| पश्चिमेस - | लागु स.नं. ८० पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत |

उपसंचालक, नगररचना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

जाहिरात क्रमांक ३०८/१९
दिनांक २/६/१९